# एबिक्स कॅशने मिळवले बस एक्स्चेंजचे कंत्राट

■ मुंबई

विमा, वित्तीय सेवा, आरोग्यसेवा आणि ई-लर्निंग उद्योगक्षेत्रांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑन-डिमांड सॉफ्टवेअर आणि ई-कॉमर्स सेवा पुरविणारी अग्रगण्य कंपनी Ebix, Inc. (NASDAQ :EBIX)ची उपकंपनी असलेल्या एबिक्स कॅश ने नॉर्थ बेंगाल स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (NBSTC) द्वारे चालविल्या जाणा-या राज्य परिवाहनाच्या सर्व बसेसच्या रचना, विकास, बांधणी, मांडणी, व्यवस्थापन, कार्यान्वयनाचे तसेच त्यांना इंटेलिजन्ट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) हस्तांतरीत करण्याचे प्रतिष्ठेचे कंत्राट बहाल करण्यात आल्याचे कंपनीने घोषित केले आहे. कलकत्ता स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (सीएसटीसी), पश्चिम बेंगाल ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (डब्ल्यूबीएसटीसी) आणि दक्षिण बेंगाल स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (एसबीएसटीसी)या पश्चिम बंगाल राज्यातील तीन महत्त्वाच्या वाहतुक संस्थांशी याआधीच केलेल्या तीन करारांमध्ये आता या नव्या कराराची भर पडली आहे. एबिक्स कॅश (EbixCash)च्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष रॉबिन रैना म्हणाले, देशभरातील राज्यांच्या मालकीच्या बसवाहतूकीच्या एक मोठ्या भागाला फेअर टिकेटिंग आणि कलेक्शन, इलेक्ट्रॉनिक टिकेटिंग मशीन्स आणि संबंधित सॉफ्टवेअरच्या सर्व यंत्रणा स्वयंचलित करण्याच्या संदर्भात EbixCash तंत्रज्ञानाचे बळ लाभत आहे.